# वसई-विरार शहर महानगरपालिका

दि.०९/०३/२०२५

## वसई विरार शहर महानगरपालिकेचा सन २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर

वसई विरार शहर महानगरपालिकेचा सन २०२५-२६ च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प दिनांक ०९ मार्च २०२६ रोजी वसई विरार शहर महानगरपालिकेचे मा.आयुक्त श्री.मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.) यांनी मा.स्थायी समिती समोर सादर केला यावेळी मा.स्थायी समिती सभापती श्री.प्रवीण शेट्टी व सर्व स्थायी समिती सदस्य उपस्थित होते.

सन २०२५-२६ चा सुधारित अर्थसंकल्प रु.३१९४.७१ कोटींचा सादर करण्यात आला असून सन २०२६-२७ चा मूळ अर्थसंकल्प रु.४२०८.९९ कोटींचा (रु.२.१२ कोटी शिल्लकेसह) आहे. सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, क्रीडा आणि पर्यटन विकास यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी दिव्यांग पार्क, संविधान पार्क, बर्ड पार्क, रांगोळीचे गाव, फुलांचे गाव आणि मच्छीमारांचे गाव अशा संकल्पना विकसित करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे यावेळी मा.परिवहन व्यवस्थापक श्री.धैर्यशील जाधव यांनी परिवहन उपक्रम अर्थसंकल्प सादर केला. सन २०२६-२७ चा परिवहन उपक्रम अर्थसंकल्प हा रु.८५.१४ कोटींचा (रु.१.५९ कोटी शिल्लकेसह) कोटींचा आहे.

या अंदाजपत्रकांवर चर्चा / विचारविनिमय होऊन सदरचे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीमार्फत मा.महासभेसमोर सादर करण्यात येईल.

सदर अर्थसंकल्प सादर करतेवेळी मा.स्थायी समिती सभापती श्री.प्रवीण शेट्टी, मा.आयुक्त श्री.मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.), स्थायी समितीचे सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र वसंत पाटील, श्री.लॉरेल डायगो डायस, श्री.पंकज पद्माकर पाटील, श्रीमती रंजना लाडक्या थालेकर, श्री.आलमगीर डायर, श्री.चंद्रशेखर शांताराम धुरी, श्री.सुनील मोरेश्वर आचोळकर, श्री.स्वप्नील जगन्नाथ कवळी, श्रीमती प्रज्ञा पाटील, श्री.महेश सरवणकर, श्रीमती दर्शना त्रिपाठी, श्री.निलेश चौधरी, श्री.जितेंद्र पाटील, श्री.अभय कक्कड, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, परिवहन व्यवस्थापक श्री.धैर्यशील जाधव, मुख्य लेखा परीक्षक श्री.दिनकर जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.इंद्रजीत गोरे, उप-मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.अभिजित मेंडगे, उप-मुख्य लेखा परीक्षक श्री.मनोज पवार, लेखाधिकारी श्री.मिलिंद पाटील, लेखाधिकारी श्री.संजय पाटील, महानगरपालिका सचिव श्री.विश्वनाथ तळेकर व लेखा विभागातील कर्मचारी उपस्थित होते.